(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर)

सर्वोच्च न्यायालय अहवाल - [१९९६] १ एस. सी. आर. - १०५३-१०५५

फौजदारी मूळ अधिकारिता

रिट याचिका (फौजदारी) क्रमांक - ३४०-४३/१९९३.

विनीत नारायण आणि इतर.

विरुद्ध

भारताचे संघराज्य आणि इतर.

३० जानेवारी, १९९६

[जे. एस. वर्मा, एस. पी. भरुचा आणि एस. सी. सेन, न्यायमूर्ती]

हवाला व्यवहार :

अन्वेषण—आचरण—प्रत्येक व्यक्तिविरुद्ध लावलेला आरोप त्या व्यक्तीचे पद आणि दर्जा काहीही असला तरी त्याची त्वरीत चौकशी होणे आवश्यक आहे - जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी सरकारी यंत्रणांचे कार्य - निःपक्षपाती असणे - निर्गमित केलेले निर्देश.

फौजदारी मूळ अधिकार क्षेत्र : रिट याचिका (फौजदारी) क्रमांक ३४०-४३/१९९३.

(भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अन्वये.)

याचिकाकर्त्यांसाठी — अनिल बी. दिवाण, कु. लता कृष्णमूर्ती, ए. के. साहू आणि कु. कामिनी जयस्वाल यांनी बाजू मांडली.

उत्तरवादींसाठी सॉलिसिटर जनरल डी. पी. गुप्ता आणि एन. नटराजन, पी. परमेश्वरन यांनी बाजू मांडली.

न्यायालयाचा खालील आदेश देण्यात आला :

या रिट याचिकेची खरी व्याप्ती यापूर्वीच्या सुनावणीदरम्यान नजरेस आणून देण्यात आली आहे. या टप्प्यावर विशेष न्यायालयात काही दोषारोपपत्रे दाखल झाली असताना आणि या प्रकरणाबाबत प्रसारमाध्यमांमध्ये बरीच प्रसिद्धी होत असताना, त्याच्या खऱ्या व्याप्तीबद्दल काही अंदाज बांधले जात असताना, हा आदेश अभिलेखाचा भाग बनविणे योग्य ठरेल.

रिट याचिकेतील आरोपांचा सारांश असा आहे की सरकारी यंत्रणा, जसे की सीबीआय आणि महसूल प्राधिकारी, त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अपयशी ठरल्या आहेत जसे की सीबीआयने टाकलेल्या काही छाप्यांमध्ये जप्त करण्यात आलेल्या तथाकथित 'जैन डायरीज' संबंधी प्रकरणांचा योग्य तपास करण्यात अपयशी ठरल्या आहेत. असा आरोप आहे की, काही अतिरेक्यांना पकडल्यामुळे हवाला मार्फत मिळालेल्या कलंकित निधीचा वापर करून त्यांना छुप्या आणि बेकायदेशीर मार्गाने,आर्थिक मदत केल्याचा शोध लागला आहे; आणि यावरून अनेक महत्त्वाचे राजकारणी, नोकरशहा आणि गुन्हेगार ज्यांना सर्व बेकायदेशीर कारणांसाठी दिलेल्या बेकायदेशीर

स्त्रोतांकडून पैसे मिळाले आहेत त्यांच्यातील संबंधही उघड झाले आहेत; आणि सीबीआय आणि इतर सरकारी यंत्रणा या प्रकरणाचा संपूर्ण तपास करण्यात आणि त्या प्रकरणास तार्किक आणि न्यायचौकशी बिंदूपर्यंत नेण्यात आणि कोणताही गुन्हा केलेल्या सर्व व्यक्तिंवर खटला चालविण्यात अपयशी ठरल्या आहेत; आणि सध्याच्या व्यवस्थेत अत्यंत प्रभावी आणि शक्तिशाली असलेल्या संबंधित व्यक्तिंचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने हे केले जात आहे; आणि या प्रकरणामुळे देशातील उच्च पदस्थांमधील गुन्हेगारी आणि सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार यांच्यातील निश्चित संबंध उघड झाला आहे, ज्यामुळे देशाची अखंडता, सुरक्षा आणि अर्थव्यवस्थेला गंभीर धोका निर्माण झाला आहे; म्हणून सार्वजनिक जीवनातील संभाव्यता, कायद्याच्या राज्यातील ऱ्हास रोखण्यासाठी आणि देशातील लोकशाहीचे जतन करण्यासाठी सरकारी यंत्रणांना त्यांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या योग्यरित्या पार पाडण्यास आणि संबंधित प्रत्येक व्यक्तीविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्यास भाग पाडले पाहिजे, मग ते सत्तेच्या सेटअपमध्ये कितीही उंचीवर असले तरी.

सध्याच्या खटल्याची वस्तुस्थिती आणि परिस्थिती असे दर्शवितात की घटनेतील समानतेची संकल्पना आणि “तुम्ही कधीही कितीही उंचीवर असाल, तरी कायदा तुमच्यापेक्षा अधिक उंचीवर आहे" हे कायद्याच्या राज्याचे मूलभूत तत्त्व सतत लक्षात घेऊन कायद्यानुसार आपली कार्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडण्याची जबाबदारी सोपविलेल्या सर्व सरकारी यंत्रणांनी तसे केले पाहिजे याची खात्री करण्यासाठी या न्यायालयाद्वारे या प्रकरणाची सखोल तपासणी करणे अत्यंत सार्वजनिक महत्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीवर वाजवी तत्त्वावर केलेल्या प्रत्येक आरोपाची चौकशी त्या व्यक्तीचे पद आणि दर्जा कोणतेही असो, योग्य पद्धतीने केली गेली पाहिजे आणि ती तत्परतेने पूर्ण केली गेली

पाहिजे. सरकारी यंत्रणांच्या निःपक्षपाती कारभारावर जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी हे अत्यावश्यक आहे.

या कार्यवाहीत आम्ही आरोपांच्या गुणवत्तेचा किंवा संबंधित व्यक्तिंच्या सामील असण्याबाबत विचार करत नाही, तर प्रत्येक व्यक्तीवरील अशा प्रत्येक आरोपाची निष्पक्ष, योग्य आणि संपूर्ण चौकशी करणे आणि कायद्यानुसार तार्किक अंतिम कारवाई करणे हे सरकारी यंत्रणांचे कायदेशीर कर्तव्य आहे.

ज्या व्यक्तिंविरुद्ध प्रथम दर्शनी खटला निष्पन्न होतो आणि सक्षम न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले जाते, तेच न्यायालय त्या प्रकरणाचा त्यातील गुणवत्तेवर, कायद्यानुसार निपटारा करेल.

तथापि, अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत संपूर्ण तपासानंतर अंतिम अहवाल असा असतो की पुढे कारवाई करण्यासाठी कोणतीही प्रथम दर्शनी केस निषपन्न झालेली नाही जेणेकरून सदर व्यक्तीविरुद्धचा खटला बंद करण्यात आला पाहिजे, संबंधित प्राधिकारी आपली कायदेशीर जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरले नाहीत आणि ते अशा निष्कर्षापर्यंत पोहोचले आहेत याबद्दल न्यायालयाचे समाधान होण्यासाठी तसा अहवाल या न्यायालयाला त्वरित सादर केला पाहिजे. सीबीआय किंवा अन्य कोणत्याही यंत्रणेने आतापर्यंत असा कोणताही अहवाल या न्यायालयात सादर केलेला नाही, तेव्हा अशा परिस्थितिमध्ये जेव्हा केव्हा असा प्रकार घडेल, न्यायालय अशा अहवालावर कारवाईचा विचार करील. या न्यायालयाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्राधिकरणाकडून कोणताही समझोता घडवून आणू नये किंवा कोणताही गुन्हा आपसांत मिटवू नये, असे आदेशही आम्ही देतो.

या प्रकरणामध्ये मध्ये मोठ्या जनसमुदायाचे हित गुंतलेले असल्याने सीबीआय आणि इतर सरकारी यंत्रणांनी हे काम पूर्ण करण्यासाठी आणि आवश्यक कालावधीपेक्षा अधिक काळ हे प्रकरण प्रलंबित राहू नये यासाठी आपल्या कारवाईला गती दिली पाहिजे. हे प्रकरण उघडकीस आल्यापासून आतापर्यंत मिळालेले निकाल, संपूर्ण चौकशीसाठी उपलब्ध झालेला वेळ आणि आणि त्यासाठी मिळालेल्या संधीशी जुळत नाहीत, हे नोंदविण्याची गरज नाही. हे अत्यंत राष्ट्रीयदृष्ट्या महत्वाचे आहे की या प्रकरणाशी संबंधित कारवाई पूर्ण करण्यात आणखी वेळ वाया जाऊ नये.

जी. एन. याचिका निकाली काढली.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**********